MHSN060000042025

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज ०२/२०२५ मधील नि.क्र.०५ खालील आदेश**
**(सरिता बाळासो येसुमाळी वि. बाळासो कृष्णा येसुमाळी)**

सदरचा अर्ज अर्जदार हिने जाबदार यांचे पगारपत्र दाखल करणे करिता संबंधीत साक्षीदारास साक्षीसमन्स काढणेविषयी विनंती अर्ज केला आहे.

०२. अर्जदारतर्फे तसेच जाबदारतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अर्जदार यांचे कथन असे की, अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज हा पोटगीची रक्कम वसुल होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. यातील जाबदार हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये कायम नोकरीला असून त्याचे बढतीवर करोली(टी), ता. कवठेमहांकाळ येथे बदली झालेली आहे. त्यामुळे जाबदार याच्या पगारात देखील वाढ झालेली आहे. त्यामुळे जाबदार याचे वेतनपत्र सादर करणेविषयी संबंधीत कार्यालयास आदेश व्हावा अशी विनंती केली.

०४. जाबदारतर्फे वकिलांनी सदरच्या अर्जास हरकत घेतली व सदरचा अर्ज प्रस्तुत कामी चालणेस पात्र नसलेचे कथन केले.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले. यातील अर्जदार हिने प्रस्तुतचे प्रकरण पोटगी रक्कम वसुली करिता दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात आज रोजी जाबदार हजर झालेले असून, त्याने आज रोजी पोटगी दाखल काही एक रक्कम भरलेली नाही. जाबदार हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी येथे नोकरीस असून, त्याला नियमीत वेतन मिळत असल्याचे अर्जदार हिचे कथन आहे. त्यामुळे सदर प्रकरणात पोटगी वसुली करिता जाबदार याचे सध्याचे वेतन प्रमाणपत्र अभिलेखावर आलेस प्रकरणाच्या निकाला करिता मदतच होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

# आदेश

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. विज बोर्ड, विश्रामबाग, सांगली यांना जाबदार बाळासो कृष्णा येसुमाळी यांचे सध्याचे (फेब्रुवारी) वेतन प्रमाणपत्र सादर करणेविषयी साक्षी समन्स काढेणेत यावे.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.03.05 17:28:10 +0530

(श्री. ए. एस. राणे)

दि.०५.०३.२०२५ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer: Smt. S.P. Patil
Name of the Court : Shri. A.S. Rane,
3rd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 05/03/2025
Order signed by
the presiding officer on : 05/03/2025
**Order uploaded on : 05/03/2025**